IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

# आदिवासी, नागरी संस्कृतीचे प्रतिक - बोहाडा

सहा. प्रा. सौ. स्वाती नवनाथ पवार
M. A. B.Ed (मराठी विभाग)
एम. एम.जगताप महाविद्यालय, महाड-रायगड.

**सारांश**

बोहाडा हा शिमगा उत्सवासारखा आदिवासी संस्कृतीचा एक भाग आहे. बोहाडा उत्सव ठाणे जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, तलासरी तालुक्यात मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो.
बोहाडा उत्सवाला 400 ते 500 वर्षाची परंपरा आहे.

**प्रस्तावना-**

आदिवासी जीवन हे अतिशय कष्टमय असते सतत कष्ट करत राहणे हेच त्यांचे दैनंदिन जीवन. अशा परिस्थितीत वर्षातून एकदा आनंदाचा दिवस त्यांच्या वाटेला येतो व तो आनंदाचा क्षण सण, उत्सव परंपरा यातून तो साजरा करताना दिसतो. ठाणे जिल्ह्यात जव्हार, मोखाडा, तलासरी या तालुक्यात बोहाडा करतात. हा बोहाडा आदिवासी समाजात कोकणा, वारली, ठाकर हा समाज करतो व बोहाडा या विधी नाट्याला 400 ते 500 वर्षाची परंपरा आहे बोहाडा म्हणजे बोहडणे अंधार दूर करणे .संपूर्ण गावाला फिरणे गावातील मुख्य रस्त्यातून बोळातून गल्लीतून गावाच्या रचनेप्रमाणे अनेक देवदेवतांची शूर-पुरुषांची राक्षसांची सोंगे सूर सनई संबळ या वाद्यांच्या तालावर नाचवली जाते .आदिवासी नागरिक संस्कृतीचे प्रतीक आणि परंपरा म्हणून हा बोहाडा महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे .आदिवासींच्या परंपरागत देवता रामायण, महाभारत, राम विजय कृष्ण विजय, विष्णुपुराण,पांडवप्रताप इत्यादी धार्मिक ग्रंथातील देवता जगदंबा उत्सवात निवडल्या जातात. आदिवासी कलाकाराने अप्रतिम हस्त कौशल्यातून उंबर सागाच्या लाकडात कोरून रेखीव देवतांचे मुखवटे तयार केले जातात. त्यावर आधुनिक रंग आणि कलाकुसर करून अधिक आकर्षक बनवले जातात. त्यानंतर रुढीपरंपरेने विशिष्ट घराण्यांमध्ये त्याचे वाटप केले जाते देवा देवांचे मुखवटे घालून पौराणिक आयुधे तसेच पोशाख करून वाजंत्री आणि सांभाळाच्या तालावर लयबद्ध नृत्याचा उत्सव म्हणून बोहाडा साजरा केला जातो. बोहाड्याला जगदंबा उत्सव असेही म्हणतात. बोहाड्याकडे बघण्याचा दृष्टिकोन हा अनेकांचा वयोगटा प्रमाणे वेगवेगळया असतो सोंगे बघणे खेळणे खरेदी करणे खाऊ खाणे व नवीन कपडे परिधान करणे हा लहान मुलांचा दृष्टिकोन तरुण मुले आपल्याला कुणी आयुष्याचा जोडीदार भेटेल आपल्या आयुष्याचा प्रश्न सुटेल नवीन गाठी बांधल्या जातील हा दृष्टिकोन तरुण मुलांचा असतो तसेच तरुण मुलांना सोंगे नाचवण्याचा व बघण्याचा आनंद असतो तर प्रौढ लोकांना पोवाडा आला म्हणजे आपल्याला देव भेटेल देवाला नवस घेऊन भावी आयुष्य आपल्या सुखात जाईल तर वयोवृद्ध माणसे मात्र पुढचा बोहाडा आपण कदाचित बघू शकणार नाही तेव्हा आपण भावपूर्ण देवाचे दर्शन घेऊ आपली मुलगी नातवंडे व इतर पाहुणे यांना भेटू वयोगटानुसार दृष्टिकोन काहीही असो परंतु बहाड्याच्या आतुरता ही सगळ्या वयोगटातील माणसांना असते.

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 5.731

Volume 2, Issue 7, January 2022

**बोहाड्याचे स्वरूप-**

होळीच्या दुसऱ्या दिवसापासून सुरू होणारा बोहाडा म्हणजे मुखवटा नाट्य तीन दिवसांचा लहान्या आणि सात दिवसांचे मोठाले बोहाडे असतात त्यात काही नवसाचे ही बोहाडे असतात बोहाडा सुरू होण्यापूर्वी गावदेवताचा मुहूर्त साधून देवी देवतांची मिरवणूक निघते त्याला मोहाटी असे म्हणतात हाताची पाचही बोटे रंगात बुडवून पंजाचकट त्याचा ठसा देवळाच्या भिंतीवर उमटवला जातो यात थापेने बोहाड्याची सुरुवात होते देवीच्या मंदिरासमोरील मोकळी जागा हेच बोहाडे चे व्यासपीठ तिथेच सारे नाट्य रंगते एका बोहाड्यात कमीत कमी 25 ते 30 कलावंत भाग घेतात पहिल्या दिवशी गणपतीचा मुखवटा घातलेली सोंग मशाली मिरवत येतात चांगल्या पावसासाठी गणेशाला गाऱ्हाणे घातले जाते माझ्या पाठवून येणारी सारजा देवी म्हणजे सरस्वती तुमच्या इच्छा पूर्ण करेल असे सांगत गणपती माघारी परत तो मग पुढले सात दिवस तारपा पिपाण्या आणि संबळ या वाद्यांच्या सुरेल कलाविष्कारावर ताल धरच सरस्वती शंकासुर त्रिशुरासुर राम शंकर मारुती खंडोबा दशमुखी रावण अशी मुखवटाधारी पात्र नाचत असतात प्रत्येक संघाचे वाजवण्याचे ठेके वेगवेगळे असतात सोंग बदलले की ठेका बदलतो कलावंत देहभान विसरून मुखवटे नाचवत असतात बोहाड्यातील मुखवटेदारी पात्रांच्या तोंडी संवाद नसतो नाचवल्या जाणाऱ्या संघांचाही घराण्यानुसार मान चालत आलेला असतो शेवटच्या पहाटे नरसिंह हिरण्यकशपूची सोंग येतात देवी अंगात संचारलेला आणि चेहऱ्यावर आंबा मातेचा मुखवटा धारण केलेल्या पुजारी वाघावर मुखवटे धारी आरुढ होत त्यांच्यावर चाल करून जातो तुंबळ युद्ध उधळते आणि त्यात असुरांचा वध होतो मग देवाची विजयी मिरवणूक निघते देवीपुढे नारळ वाढवून पूर्ण झालेले नवस फेडले जातात.

**बोहाड्याबाबत आदिवासी बांधवांच्या श्रद्धा व समजूती-**

आदिवासी बांधवांची स्वतःची अशी एक जीवनशैली आहे त्यांच्या परंपरा चालीरीती देवदेवता ही वेगळया आहेत त्याच परंपरेतल्या बोहाडा उत्सवाला आदिवासींच्या धार्मिक जीवनात वेगळे स्थान आहे बोहाडा केला नाही तर देवाचा कोप होईल पाड्याचा विनाश ओढवेल अन्नधान्य पिकणार नाही पाण्या वाचून लोक तडफडून मरतील अशी भीती प्रत्येक आदिवासीच्या मनावर लहानपणापासूनच बिंबवली जाते त्यामुळे प्रत्येक आदिवासी बांधव या उत्सवात श्रद्धेने सहभागी होताना दिसतो.

**निष्कर्ष-**

आदिवासींचा प्रकृतीशी अत्यंत घनिष्ठ संबंध आहे. प्राकृतिक शक्तीना प्रसन्न करण्यासाठी ते पारंपारिक पद्धतीने अनेक प्रकारचे विधी, उत्सव, साजरे करीत असतात. आदिवासींचा बोहाडा मुख्य उत्सव आहे. बदलत्या काळानुसार बोहाडा उत्सवात आणि बदल घडवून येत आहे. पूर्वी अनेक दिवसांपर्यंत चालणारा 'बोहाडा' आता दोन ते तीन दिवसात आटोपला जातो. दिवसेंदिवस समाजामध्ये धार्मिक प्रवृत्ती कमी होत असल्याने तसेच लोक रंजनाचे अनेक साधने निर्माण झाल्याने बोहाडा उत्सवा प्रति लोकांची आत्मीयता कमी होत आहे. अनेक गावात राजकारण शिरल्याने बोहाडा गटागटात विभागला गेला आहे तरीही बोहाड्याची परंपरा सुरू आहे.

**संदर्भ ग्रंथ-**

[1].महाराष्ट्र टाइम्स, मुंबई टाइम्स, वसई विरार पुरवणी-- शुक्रवार दिनांक 10 मार्च 2023.

[2].मुंबई सकाळ आठ मार्च 2023.

[3].लोकसाहित्य- कला व संस्कृती प्रा. डॉ. द.के गंधारे , प्रा. डॉ. तुकाराम रोंगटे, प्रा. डॉ. निवृत्ती मिसाळ.

[4].गावित माहेश्वरी--- लोकसाहित्य जीवनकला पृष्ठ क्रमांक 125.